**कोतवालांना गट-ड (वर्ग-४)मधील पदांवरील नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक-स-३०/४२००/ प्र.क्र.६३५/ई-१०
दिनांक- २२.३.२००१.

महाराष्ट्र राज्यातील काही कोतवालांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणाकडे वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्यासंदर्भात याचिका दाखल केल्या होत्या. मा. न्यायाधिकरणाने यासंदर्भा धोरणात्मक आराखडा तयार करावा असे आदेश दिले आहेत. उपरोक्त आदेश विचारात घेऊन कोतवालांना गट-ड (वर्ग-४ ) मधील पदांवर नियुक्ती देण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे-

कोतवाल हे महसूल विभागाच्या अधिपत्याखालील अवर्गीकृत कर्मचारी असल्याने त्यांना फक्त महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेल्या कार्यालयातील गट-ड मधील नियमीत पदांवरील किमान वेतनश्रेणीप्रथम नियुक्तीच्या पदांवरील नेमणूकीसाठी कोतवाल भरती व नेमणूक याबाबतच्या दिनांक ७ मे १९५९ च्या शासन निर्णयातील नियम २२ येथील तरतुदींप्रमाणे पुढील अटींवर प्राधान्य देण्यात यावे-

१) गट-ड मधील पदांकरीता शासनाने विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेली असावी.

२) कोतवालांना सेवेत घेण्यासाठी कमाल वयोमर्यादा ४० पर्यंत विहीत केलेली असल्याने त्यांना गट-ड मधील पदांवर नियुक्ती मिळण्याकरिता उच्चतम वयोमर्यादा ४५ पर्यंत शिथील करण्यात यावी.

३) गट-ड मधील नियुक्ती ही नवीन नियुक्ती समजण्यात यावी व कोतवाल हे पद अवर्गीकृत असल्याने त्या पदावरील सेवेचा विचार कोणत्याही कारणास्तव वर्ग-४ च्या पदावरील सेवेचे फायदे देताना करण्यात येऊ नये.

17 APR 2001

उपरोक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने कोतवालांना गट-ड (वर्ग-४ ) च्या पदावर नियुक्ती देण्यासंदर्भात जिल्हाधिका-यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

सदर आदेश सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारीक संदर्भ क्रमांक प्र.क्र.४१९/१०-०१/व्यय-९, दिनांक २१.३.२००१ अन्वये निर्गमीत करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रज्ञा सं. महाले)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी.

सर्व विभागीय आयुक्त.

कार्यासन अधिकारी ,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

कार्यासन अधिकारी, वित्त विभाग ( सेवा-३ /व्यय-९ / अर्थसंकल्प-१९)मंत्रालय,मुंबई-३२.

कार्यासन अधिकारी, ई-१०, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२. (निवडनस्ती)

क्रमांक/कुळकायदा-३/कावि-२५०
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि २६/७/२००१

प्रतिलिपी - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१) उपविभागीय अधिकारी (सर्व)
२) तहसिलदार (सर्व)
यांना पारित संदर्भीय आदेशाच्या शासकीय माहितीसाठी